8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## परतूर नगरपालिकेमध्ये ४०० घरकुलांचा घोटाळा करणाऱ्यांना एसआयटीचे आदेश असताना अद्याप अटक का नाही?

### आमदार बबनराव लोणीकर यांचा विधानसभेत प्रश्न; १६ कोटी रुपयांची वसुली करण्याची मागणी

**मुंबई -** परतुर विधानसभा मतदारसंघातील परतुर, मंठा, आष्टी व सेवली या चारही पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत असणाऱ्या पोलीस बांधवांसाठी पोलीस वसाहत बांधकाम आवश्यक आहे. सर्वसामान्य नागरिकांचे संरक्षण करणारे पोलीस व आरोग्याची काळजी घेण्यासाठी कायम तत्व असणारे आरोग्य कर्मचारी यांच्या निवासस्थानाची अवस्था अत्यंत दयनीय असून जिल्हाभरात पोलिसांच्या व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या घरांची अवस्था अत्यंत वाईट असून पोलीस बांधवांसह आरोग्य कर्मचाऱ्यांना देखील तात्काळ घरे देण्यात यावीत अशी म ागणी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत केली.

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, परतूर नगर पालिकेमध्ये तत्कालीन नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या संगणमताने रामदेव बाबा ट्रस्ट नावाच्या बोगस ट्रस्टला परतुर नगरपालिका कार्यक्षेत्रातील ४०० घरकुल बांधण्याचे कंत्राट देण्यात आले होते या सर्व घरांचे अत्यंत निकृष्ट दर्जाचे व बोगस स्वरूपाचे बांधकाम झाले होते हे सर्व घरे त्या घरांवरचे स्लॅब भिंती खिडक्या दरवाजे सर्व काही बोगस वापरण्यात आले होते त्यामुळे अनेक घरांचे स्लॅब कोलमडून पडले त्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केल्यानंतर एसआयटी चौकशी समिती नेमण्यात आली या समितीने आपला अहवाल सादर करत संबंधित ट्रस्ट तत्कालीन नगराध्यक्ष व तत्कालीन परतूर नगरपालिकेचे यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यासंदर्भात सूचना करण्यात आली होती. २० वर्ष कॅबिनेट मंत्री पदावर राहिलेल्या लोकप्रतिनिधींना घरकुल घोटाळ्यामध्ये तुरुंगात जावे लागले होते परंतु अद्याप पर्यंत यापैकी कुणालाही अटक का करण्यात आले नाही? असा सवाल आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत उपस्थित केला.

या अनुषंगाने पुढे बोलताना श्री लोणीकर



म्हणाले की तत्कालीन रामदेव बाबा नावाच्या ट्रस्टने ४०० बोगस घरकुलांचे बांधकाम केले त्यासाठी १६ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते ट्रस्टला धनादेशाच्या स्वरूपात जी रक्कम देण्यात आली त्यावर तत्कालीन नगराध्यक्ष व तत्कालीन मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी आहे एस आय टी चौकशी समितीने रामदेव बाबा ट्रस्ट नगराध्यक्ष व मुख्याधिकारी या तिघांनाही दोषी धरून गुन्हे दाखल करण्यासंदर्भात आदेशित केले होते त्यानुसार आतापर्यंत अटक करणे आवश्यक होते त्याचबरोबर बोगस कामासाठी खर्च करण्यात आलेली १६ कोटी रुपयांची रक्कम संबंधित ट्रस्ट तत्कालीन नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्याकडून वसूल करण्यात यावे अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत केली.

सार्वजनिक आरोग्य संदर्भात बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय हाय पावर कमिटीच्या बैठकीमध्ये मंजूर करण्यात आले असून मंजुरी आदेश प्राप्त झाले आहेत परंतु अद्याप पर्यंत निविदा काढण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. ती निविदा प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्यात यावी. तसेच नव्याने मंजूर करण्यात आलेले मंठा तालुक्यातील ढोकसाळ व दहिफळ खंदारे, परतुर तालुक्यातील वाटूर व आष्टी प्राथमिक आरोग्य केंद्र यांना प्रत्येकी ०१ कोटी ४३ लाख रुपये असा तुटपुंजा निधी मंजूर करण्यात आला आहे या निधीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम होऊ शकत नाही त्यासाठी कमीत कमी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला १० कोटी रुपये निधीची आवश्यकता असून वाढीव निधी तात्काळ मंजूर करण्यात यावा.

परतुर विधानसभा म तदारसंघात नव्याने मंजूर करण्यात आलेले १५ उपकेंद्र यांची निविदा प्रक्रिया तात्काळ पूर्ण करणे, बांधकाम वेळेत पूर्ण करणे आवश्यक असून पूर्णपणे जीर्ण झालेले प्राथमिक आरोग्य केंद्र व कर्मचारी निवासस्थाने यांची नव्याने मंजुरीसह बांधकाम ासाठी निधी उपलब्ध करून देणे देखील आवश्यक आहे. सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी रिक्त पदांची भरती अर्थात ए.एन.एम., जी.एन.एम. यांच्यासह जिल्हाभरातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र मध्ये पान ३ वर

## औरंगजेबाची कबर तोडायला तुमची मुले पाठवा

### राज्यसभेत संजय राऊत आक्रमक

**नवी दिल्ली -** राज्यात गेल्या काही दिवसांपासून पेटलेला औरंगजेबच्या कबरीचा मुद्दा आता राज्यसभेत पोहचला असून, शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी हात मुद्दा आज राज्यसभेत उपस्थित केला. यावेळी ते म्हणाले, म णिपूरनंतर महाराष्ट्र जळत आहे, नागपूरमध्येही दंगली होत आहेत. गृह मंत्रालयाने गेल्या काही वर्षांत देशाला पोलीस स्टेट (सरकारी नियंत्रण) बनवले आहे. याचबरोबर संजय राऊत यांनी केंद्र सरकारला औरंगजेबची कबर तोडण्याचे आव्हान दिले व औरंगजेबाची कबर तोडण्यासाठी तुमच्या परदेशात शिकत असलेल्या मुलांना पाठवा असेही म्हटले. दरम्यान संजय राऊत यांच्या या भाषणावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहदेखील सभागृहात उपस्थित होते. गृह मंत्रालयाच्या कामकाजावरील चर्चे त सहभागी होत, राऊत यांनी सरकारवर टीका केली. त्यांनी आरोप केला की देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्ती वारंवार औरंगजेबाचे नाव घेत आहेत, ज्यामध्ये महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि केंद्र सरकारमधील वरिष्ठ पदांवर असलेल्या लोकांचा समावेश आहे. जर तुम्हाला औरंगजेबाची कबर तोडायची असेल तर खुशाल तोडा, तुम्हाला कोण रोखत आहे. केंद्रात आणि राज्यात तुमचे सरकार आहे. मुख्यमंत्री तुमचे आहेत, गृहमंत्री तुमचे आहेत तिथे जावा आणि तोडा. पण कबर तोडण्यासाठी तुमच्या मुलांना पाठवा आमच्या नाही. तुमची मुलं परदेशात शिक्षण घेत आहेत, परदेशात नोकरी करत आहेत आणि गरीब मुलांची माथी भडकावून ही कामे करायला लावत आहात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या म तदारसंघातील दंगलींचा संदर्भ देत संजय राऊत पुढे म्हणाले की, आतापर्यंत मणिपूर जळत होते पण आता महाराष्ट्रही जळत आहे.

गेल्या ३०० वर्षात नागपूरमध्ये एकही दंगली झालेली नाही, असे सांगून राऊत म्हणाले, औरंगजेबाचे नाव पुन्हा पुन्हा घेऊन देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींपैकी काही महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि केंद्र सरकारमधील वरिष्ठ पदांवरील लोक आहेत. जर आपण त्यांना रोखले नाही तर हा देश एकसंध आणि एकात्मिक राहणार नाही.

युवा आदर्श

### दुचाकी ...

सुवर्ण क्षण आठवे
दुचाकी आली घरी
दंगलीत केली राख
परिवारा आली घेरी
बजेटची ताणाताण
प्रयास केले परोपरी
गरज ही तातडीची
अवतरली स्वप्न परी
चैन मौज नसे मुळी
ऋण बोजा डोईवरी
चारचाकी सुख लाभे
आरुढताचं सिटावरी
परिवार सदस्य वाटे
दुचाकी किमयागारी
हप्ते रे नियमित भरी
ओढाताण हो पगारी
भक्ष्यस्थानी भस्म गं
महा क्रूर दंगलखोरी
सामान्य भरडले जाई
अघोरी रे हरामखोरी
अनिश्चित विमाक्लेम
कारणे ती कैक सारी
विचारी रे प्रश्न हजारी
जणू आम्ही करेचोरी
हक्काचे घालवून बसे
नाही आम्ही भिकारी
डोळे लावून बसायचे
मदत मिळेलं सरकारी

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## शिवद्रोही प्रशांत कोरटकरला अटक करा

### अन्यथा राज्याभरात तीव्र आंदोलन; मराठा क्रांती मोर्चा, शिवप्रेमी संघटनांचे धरणे आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** शिवद्रोही प्रशांत कोरटकर याला तत्काळ अटक करून राजद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत, या मागणीसाठी शुक्रवार दि. २१ रोजी मराठा क्रांती मोर्चा आणि सर्व शिवप्रेमी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन करण्यात आले. विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले. तात्काळ कारवाई न केल्यास जिल्हयासह राज्यभरात तीव्र आंदोलन करण्याचा निर्धार मराठा क्रांती मोर्चा आणि सर्व शिवप्रेमी संघटनांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर काही समाजकंटक हेतुपुरस्सर अवमान होईल, अशी टीका टिप्पणी करतात व त्यावर शासन कठोर कायदेशीर कारवाई करताना दिसत नाहीत उलट अशा आरोपींना पोलीस, सरकार फरार होण्यासाठी मदत करत असल्याचे दिसुन येत आहे. हे अतिशय गंभीर आहे. गुन्हेगार सोशल मिडीयात आपली जाहीर भूमिका मांडतात. जामिनासाठी राजरोस फिरतात मात्र पोलिसांना गुन्हेगार सापडत कसा नाही असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, शिवद्रोही प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांना तातडीने अटक करून, राजद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत आणि खटले फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावेत. शिवद्रोह्यांना राज्यसरकार जी महत्वाची वागणूक देत आहे आणि त्यामुळे त्यांना राष्ट्रद्रोही गुन्हेगारासम कठोर कारवाई करत उचलून आणून अटक करत नाही, तसेच त्यांच्या पाठीमागील मास्टरमाईंडचा शोध घेत नाही किंवा त्यांच्या विरोधात कारवाई करत नाही ही वस्तुस्थिती आहे. याच प्रवृत्तींनी अश्याच प्रकारे यापूर्वीसुध्दा राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संदर्भात सुध्दा असंस्कृत, विकृत, घाणेरडी विधाने केली होती. परंतु राज्यसरकारने बोटचेपी भुमिका घेतल्यामुळे अशा राष्ट्रद्रोही शक्तीचे मनोबल वाढले आहे म्हणून या गुन्हेगारावर कठोर कायदेशीर कारवाई करून त्यांचा कायमचा बंदोबस्त करून इतरांना जरब बसवावी. म राठ्यांच्या व रणरागिणी छत्रपती तारााराणी यांच्या अत्यूच्च शौर्याचे निशाणी औरंगजेबाची कबर असून ती उखडून टाकण्याचे जे षडयंत्र रचले जात आहे हे मराठा इतिहासावर जबरदस्तीचे सांस्कृतिक व ऐतिहासिक आक्रम णच आहे. लक्ष्मण ऊत्तेकराने छावा मध्ये शिर्के घराण्यांचा खोटा इतिहास दाखवला आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या क्रूर मृत्यूला औरंगजेब सह




कुठल्या तत्कालीन धार्मिक शक्ती व सल्लागार जबाबदार आहेत त्याचेही सत्य शासनाने जनतेसम ोर आणले पाहिजे. सर्वसत्ताधीश मुघल बादशहा औरंगजेब याला झुंजवत याच महाराष्ट्र भुमित गाडला अशा रणरागिणी छत्रपती ताराराणी यांचे भव्य अश्वारूढ स्मारके मुंबईत मंत्रालयासह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ऊभे करावेत आणि त्यांचा फोटो मंत्रालय प्रवेशद्वार ते सर्व शासकीय कार्यालयात तातडीने लावावेत तसेच शालेय, महाविद्यालय, संशोधन २ अभ्यासक्रमात रणरागिणी ताराराणी चा शौर्याचा इतिहास समाविष्ट करावा.रणरागिणी छत्रपती ताराराणी व छत्रपती थोरले शाहू महाराज यांचे साता-यातील समाधीस्थळ उचित दर्जाचे बांधकाम करून शासकीय इतमामात पुजा दिवाबत्ती करणेचा निर्णय तातडीने करावा. दिल्लीच्या तालकटोरा येथे मराठा विर पेशवा बाजीराव पहिला, श्रीमंत महादजी शिंदे, श्रीमंत मल्हारराव होळकर यांच्यासह तत्कालीन छत्रपती शंभुपुत्र शाहू महाराज यांचाही छत्रपतीच्या इतमामाला साजेसे स्मारक ऊभे केले पाहिजे.आरेस्सेस प्रमुख मोहन भागवत आणि सावरकर स्मारक चे रणजित सावरकर यांना कायदेशीर नोटीस देऊन त्यांनी त्यांच्या साहित्यातून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, शिवशाही, स्वराज्य यासंदर्भात जे अनैतिहासिक, बेजबाबदार, बदनामीकारक लिखाण समाविष्ट केले आहे पान ३ वर

## जालन्यात विधिनाट्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे जालना येथे १० दिवसीय विधीनाट्य प्रशिक्षण शिबिर दिनांक २२ ते ३१ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.

येथील जेईएस महाविद्यालयाच्या लोककला विभागात हे शिबिर होणार असून शनिवार (दि. २२) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंडितराव भुतेकर आणि प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होणार आहे.

महाराष्ट्राच्या लोककलेचे जतन व संवर्धन करून नवे कलाकार घडवण्यासाठी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि विकास खारगे, अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सांस्कृतिक कार्य संचालक श्री.विभीषण चवरे यांच्या नियोजनात हे प्रशिक्षण शिबिर होणार आहे.

शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून म हाराष्ट्रातील प्रसिद्ध लोककलाकार व अभ्यासक मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या कलावंताना महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र दिले जाईल तसेच शेवटच्या दिवशी सादरीकरणाची संधी विद्यार्थ्यांना मिळेल. शिबिराच्या यशस्वितेसाठी जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग सहकार्य पान ३ वर

## संभाजी ब्रिगेड संघटनेचा आवाज विधान परिषदेच्या सभागृहात

### आठ आमदारांनी मांडला प्रस्ताव

**मंठा । प्रतिनिधी -** संभाजी ब्रिगेड मंठ्याचा (ग्रामसेवक हे मुख्यालयी वास्तव्यास राहत नाहीत.) हा प्रश्न विधान परिषदेत तारांकित प्रश्नात आठ आम दारांनी मांडला.संभाजी ब्रिगेड मंठा च्या वतीने मागील सात ते आठ महिन्यापासून शासनाच्या परिपत्रकनुसार ग्रामसेवक हे मुख्यालयी वास्तव्यास असणे बंधनकारक असतानाही संपूर्ण मंठा तालुक्यात एकही ग्रामसेवक हा मुख्यालयी वास्तव्यास राहत नाही.हाच प्रश्न घेऊन विधान परिषद तारांकित प्रश्न क्र.७०१ विधान परिषद सदस्य आ. राजेश राठोड, अशोक उर्फ भाई जगताप, सतेज उर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, जयंत आसेगावकर, सुधाकर अडबाले, धिरज लिंगाडे या सर्व आमदारांनी मांडला याबद्दल सर्व आमदार यांचे संभाजी ब्रिगेड मंठा च्या वतीने आभार मानण्यात आले. शासनाच्या परिपत्रकनुसार ग्रामसेवक हा मुख्यालयी वास्तव्यास असावा ह्या म ागणीसाठी संभाजी ब्रिगेड मंठाच्या वतीने मागील अनेक महिन्यापासून पंचायत समि ती मंठा यांना वेळोवेळी निवेदन देण्यात आले.त्याच बरोबर तालुक्यातील सर्व गावोगाव जाऊन स्वाक्षरी मोहीम अभियान राबवून ग्रामसेवक हे मुख्यालयी राहत नाही.या बाबत एकूण ११७ गावात जाऊन स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली.काही-काही गावात तर अशी परिस्थिती आढळून आली की सहा-सहा महिन्यापासून ग्राम सेवक येत नसल्याच्या अडचणी संदर्भात गावकऱ्यांचे व्हिडीओ असेल वा ऑडिओ पुरव्यासहीत पंचायत समिती याना देऊन पंचायत समिती समोर या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. यावर त्यांचे भाडे भत्ते बंद करण्याची कारवाई करण्यात आली.या नंतर संभाजी ब्रिगेड च्या वतीने सर्व पुराव्या सहित पान ३ वर

## संपादकीय

# तरच जागतिक जल दिनाचे सार्थक!

आजचा दिवस जागतिक जल दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. पाण्याची गरज नाही असे कोणतेच क्षेत्र नाही. पण आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २२ मार्च १९९३ रोजी पहिल्यांदा जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. ब्राझीलची राजधानी रियो डी जिनोरियो येथे पहिला जल दिन साजरा करण्यात आला. पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. २२ मार्च हाच दिवस जागतिक जल दिन म्हणून निवडण्यामागे कारणही तसेच आहे. २२ मार्च पासून वातावरण बदलास सुरवात होते. त्यामुळे तात्विक दृष्ट्या पावसाळ्याची सुरवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो. हा तर्क वापरुन हा दिवस निवडण्यात आला आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे. वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यास हे पाणी कमी पडत आहे. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज असली तरी इतर सजीव पाण्याच्या अपव्यय करित नाहीत मानव मात्र पाण्याचा मोठा अपव्यय करतो, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरतो. पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाटयाने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी बोअरवेल घेऊन जमीनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे. त्यामुळेच कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल असा अहवाल काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्र संघाने दिला आहे. २०२५ पर्यंत जगातील एक तृतीयांश देशात पाणी पेटणार असल्याचे संकेत शास्त्रज्ञांनी दिले आहेत. आशिया खंडाबाबत सांगायचे झाले तर भारतात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरवातीलाच पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो. महाराष्ट्रातील मराठवाडा सारख्या विभागात तर दरवर्षी दुष्काळ असतो. लातूर सारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवठा करावा लागतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणी टंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. एकदा आलेला टँकर आठ दिवसांनीच पुन्हा येतो. काही गावात तर एका महिन्यात एकदाच पाणी मिळते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करूनच आपण पाणी टंचाईवर मात करू शकतो. जल है तो कल है... या उक्तीनुसार येणारा काळ सुखकर करायचा असेल तर पाण्याची बचत करावीच लागेल. आजच्या दिवशी प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रयत्न केला तरच जागतिक जल दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# डॉ. दयानंद राणे यांना पीचडी उपाधी प्रदान




**मुंबई । प्रतिनिधी -** वॉशिंग्टन डीसी ( यु.एस ) येथील नामांकित cederbrook university कडून वैदिक वास्तुशास्त्र या विषयातील विशेष संशोधन कार्यासाठी डॉ. दयानंद वासुदेव राणे (डॉ. आनंद) यांना डॉक्टर ऑफ फिलोसोफी (पी.एच.डी.) उपाधी नुकतीच प्रदान करण्यात आली.

डॉ. दयानंद व्ही. राणे गेली २३ वर्षांपासून वैदिक वास्तुशास्त्र व वैदिक साहित्य क्षेत्र, संशोधन व प्रशिक्षण यामध्ये कार्यरत आहेत. वैद्यक विषयातील पदवीधर असलेले प्रा.डॉ. दयानंद राणे भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संशोधन संस्था मुंबईएँ या संशोधन प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष असून वैदिक वास्तुशास्त्र व डाउझिंग विषयात हजारो विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत आहेत.

त्यांनी सूक्ष्म स्पंदन विज्ञान व वनस्पती विज्ञान या विषयातील गंधपरमानू एन इफेक्ट ऑफ ह्युमन बॉडी ॲड. वास्तु हा संशोधन प्रबंध लिहिला आहे व त्यासाठी त्यांना सदर पी.एच.डी.मिळाली आहे.

### सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सवानिमित्त

# गोव्यात ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’चे भव्य आयोजन!




**पणजी (गोवा) -** समस्त मानवजातीच्या परम कल्याणासाठी, तसेच राम राज्याच्या स्थापनेसाठी कार्यरत सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव सोहळा आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने गोवा येथे ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव’ भव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. हा महोत्सव १७ ते १९ मे २०२५ या तीन दिवसांच्या कालावधीत फार्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. या भव्य महोत्सवासाठी देशभरातून अनेक संत-महंत, मुख्यमंत्री, केंद्र आणि राज्य सरकारांतील मंत्री, प्रखर हिंदुत्वनिष्ठ, विचारवंत, अधिवक्ता, उद्योजक, संपादक आदी मान्यवरांसह २० हजारांहून अधिक साधक, धर्मप्रेमी हिंदू उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

पणजी येथील हॉटेल मनोशांतीमध्ये झालेल्या या पत्रकार परिषदेला आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. संतोष घोडगे, सांस्कृतिक न्यासाचे श्री जयंत मिरिंगकर, भारत स्वाभिमानाचे श्री. कमलेश बांदेकर, ब्राह्मण महासंघ गोवाचे श्री. राज शर्मा, गोमंतक मंदिर महासंघाचे श्री. जयेश थळी, कुंडई तपोभूमी येथील पद्मनाभ संप्रदायाचे श्री. सुजन नाईक, जगद्गुरु स्वामी नरेंद्राचार्य महाराजांचे अनुयायी श्री. अनिल नाईक, तसेच उद्योजक श्री. राघव शेट्टी आणि कदंबाचे माजी महाव्यवस्थापक श्री. संजय घाटे हे उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेत ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’चे बोधचिन्ह (लोगो) आणि ‘धर्मेण जयते राष्ट्रम् ।’ या घोषवाक्याचे (टॅगलाईन) अनावरण करण्यात आले.

महोत्सवाविषयी माहिती देतांना श्री. चेतन राजहंस पुढे म्हणाले की, सनातन संस्था गेली २५ वर्षे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली गोमंतकाच्या पवित्र भूमीतून, आदर्श आणि संस्कारी पिढी घडवण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त रामराज्य-स्वरूप आदर्श राष्ट्र निर्माण करण्यासाठी सामूहिक संकल्प केला जाणार आहे. याद्वारे सर्व आध्यात्मिक संस्था आणि हिंदू संघटना यांच्यातील धर्मबंधुत्व अधिक दृढ होईल. भारतासमोर उभी असलेली आव्हाने पाहिली, तर सनातन धर्मियांचे अस्तित्व आणि सनातन धर्माचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे; म्हणूनच राष्ट्राचे सनातनत्व टिकवून ठेवणे आणि सनातन मानबिंदू अर्थात् गो, गंगा, गायत्री, मंदिरे, वेदादी धर्मग्रंथ यांना पुनर्वैभव प्राप्त करून देणे यांसाठी ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव’ आयोजित केला आहे. गोव्यात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर तीन दिवसांसाठी संत-महंत, हिंदुत्वनिष्ठ, मान्यवर आणि प्रतिष्ठित यांच्यासह २० हजारांहून अधिक साधक अन् धर्मनिष्ठ एकत्र येत आहेत. हा जणू गोमंतक भूमीतील सनातन धर्मीयांचा भव्य कुंभमेळाच असून येथे धर्म आणि अध्यात्म यांची दिव्य ज्ञानगंगा प्रवाहित होणार आहे.

या महोत्सवात देशभरातून येणारे संत, महंत तथा धर्मगुरु यांच्या संतसभेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्र, धर्म, संस्कृती आणि हिंदु समाज यांना पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी ते आपल्या ओजस्वी वाणीने मार्गदर्शन करणार आहेत. या वेळी मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शनही होणार आहे.

महोत्सवाला आमंत्रित संत-महंत आणि विशेष मान्यवर : ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकरजी, पतंजली योगपीठाचे संस्थापक प.पू. योगऋषि स्वामी रामदेवजी, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी आणि न्यासाचे महासचिव श्री. चंपत रायजी, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष पू. महंत रविंद्र पुरीजी महाराज, अयोध्या हनुमानगढी येथील पू. महंत राजू दास, श्रीक्षेत्र तपोभूमी (कुंडई, गोवा) पिठाधीश्वर पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंदाचार्य स्वामीजी, ‘सनातन बोर्ड’चे प्रणेते पूज्यश्री देवकीनंदन ठाकूरजी महाराज, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपादजी नाईक, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोदजी सावंत, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे, तेलंगाणा येथील भाजपचे आमदार टी. राजासिंह, माजी केंद्रीय माहिती आयुक्त श्री. उदय माहुरकर, तसेच काशी-मथुरा येथील मंदिरांचा खटला लढवणारे सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णु शंकर जैन आदी अनेक मान्यवरांना या कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले आहे.

# जल ही जीवन, जल ही अमृत संपूर्ण सृष्टीसाठी पाण्याचा एक-एक थेंब महत्त्वाचा

आज जगात पाणी हा महत्वाचा घटक आहे. कारण जल नहीं तो कुछ नहीं! पृथ्वीतलावर मानवजातीच्या अतीरेकामुळे आज निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.अन्न, वस्त्र, निवारा याची मुख्य जळ-मुळ पाणी आहे. कारण पाण्याशिवाय कोणतीही गोष्ट शक्यच नाही.भारतासह अनेक देशांमध्ये दरवर्षी पाण्याचा हा!हा!कार! होतांना आपण पाहतो.भारतात मार्च महिन्यापासुनच देशातील अनेक भागांत पाण्याची समस्या निर्माण झाली आहे.आजही अनेक देश पाण्यासाठी कडवी झुंज देत आहे. आज आपण कुठेही गेलो तरी पाणी अती आवश्यक आहे.आकाश-पाताळ,पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन म्हणजेच आपण जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी मानव, पशु-पक्षी व संपूर्ण जीवजंतू हे पाण्याविना जगुच शकत नाही.पाण्याविना निसर्ग नाही व मानवही नाही. म्हणजेच आज पाणी सर्वांसाठीच अनमोल आहे.त्यामुळे पाण्याचे महत्व सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.१९९२ ला पर्यावरण व विकास या विषयावर संयुक्त राष्ट्र संमेलन आयोजित करण्यात आले होते.यावेळेस विश्व जल दिवस या विषयावर चर्चा करण्यात आली व संयुक्त राष्ट्र संघानेने प्रत्येक वर्षी २२ मार्चला विश्व जल दिवस साजरा करण्याचे जाहीर केले.यानंत १९९३ मध्ये २२ मार्चला संपूर्ण जगात विश्व जल दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला.यावेळेस जल संरक्षण आणि रख-रखाव यावर जनजागृतीचे मोठे अभियान छेडण्यात आले.विश्व जल दिवसाला पाणी वाचविण्याचा संकल्प दिवस सुध्दा म्हटल्या जाते.या दिवसाला पाणी संरक्षणा विषयी जागृकता व पाण्याचे महत्व याला जास्त महत्त्व दिले जाते.आज मानवाच्या जीवनाचा महत्वाचा घटक म्हणजे पाणी आहे.कारण पाण्याविना संपूर्ण सृष्टीअधुरी आहे.आपण जगाच्या भुभागाचा विचार केला तर या पृथ्वीतलावर ७० टक्के पाणी व ३० टक्के भुभाग आहे.तरीही जगात पीण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते. कारण ७० टक्के समुद्राचे पाणी खारे असल्यामुळे पीण्यायोग्य नाही.सध्या संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करतांना दिसते.त्यामुळे जगात अनेक नवीन नवीन समस्या उदयास येतांना दिसतात.त्यामुळे आज संपूर्ण जगात पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे बदलते हवामान व जगातील वाढती लोकसंख्या यामुळे जगातील ५० टक्के जंगलसंपदा मानवाच्या अतिरेकामुळे नस्तनाबुत झाली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता ते सरळ समुद्रात जात आहे. यामुळे आज जगात अत्यंत गंभीर समस्या निर्माण होऊन दिवसेंदिवस समुद्राची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. समुद्राची पातळी वाढने म्हणजेच पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीच्या बाबतीत धोक्याची घंटा आहे. त्यामुळे पाण्याचा विषय साधा नसुन अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.जगात वाढते कारखाने, औद्योगिकीकरण, शहरीकरण,अनेक परमाणु परिक्षण यामुळे निसर्गानचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.कारखाण्यांच्या दुषीत वातावरणामुळे व तापमानामुळे अनेक हिमकडे कोसळताना आपण पहातो.यामुळे संपूर्ण जगात महाप्रलय, सुनामी आल्याचेसुध्दा आपणासर्वांना ग्यात आहे.जगातील हिमकडे साबुत रहाले तर पाण्याची समस्या आपोआप कमी होईल.परंतु मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी हिमकड्यांचा बळी घेतांना दिसत आहे.अनेकदा देवभुमित आलेला महाप्रलय हा हिमकडा कोसळल्याने आलेला महाप्रलय आहे.संपुर्ण भारतात ८० टक्के पीण्यायोग्य पाणी हिमकड्यातुन मीळत असते. परंतु मानवाच्या अतीरेकामुळे हिमकडे वेळेच्या आधी वितळायला लागले तर या पृथ्वीतलावर २० वर्षांनंतर पीण्याकरीता एक थेंब सुध्दा पाणी मिळणार नाही.त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी तळागाळातुन प्रयत्न व्हायलाच पाहिजे.आज जंगलातील संपूर्ण हिंसक पशु शहरांकडे का येत आहे.याचा विचार कोणीच करीत नाही.




परंतु जगातील संपूर्ण मानवजातीने हे लक्षात ठेवले पाहिजे की,जंगलातील हिंसक पशु-पक्षी शहरात येत नसुन आपण त्यांच्या घरावर म्हणजेच जंगलावर अतिक्रमण करीत आहोत. त्यामुळे जंगलातील पशु-पक्षी शहरात व गावात येतांना दिसतात.पुर्वी छोटे-छोटे तलाव असायचे.परंतु आज पुर्विचे छोटे-छोटे तलाव वस्ती व कारखाण्यामध्ये परीवर्तीत झालेले दिसुन येतात.त्यामुळे आज गावात, शहरात,वस्तीत संपूर्ण ठिकाणी पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अत्याचार होय.सध्याच्या काळात जगामध्ये आगजनीच्या घटना व वनवेलागने मोठ्या प्रमाणात दिसून येतात.अनेक मोठमोठी जंगले अजुनही जळत आहे.कारण मानवाने जमीनीच्या पोटातील पाणी संपूर्णतः निचोडुन (आटवुन) टाकले आहे.जगातील अनेक भागात ज्वालामुखीचा उद्रेक मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो.भुकंप,सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण घटना पृथ्वीतलावर पाण्याची पातळी कमी होत असल्याने होत आहे. कारण जंगलसंपदा टीकुन रहाली असती तर पाण्याची समस्या मुळातच रहालीच नसती. पाणी टीकुन रहाले असते तर ज्वालामुखी, सुनामी, महाप्रलय,भुकंप,वनवे लागने इत्यादी विनाशकारी घटनांचा उद्रेक झाला नसता. अजुनही मानवजाती पाण्याचे महत्व समजल्याचे दिसून येत नाही.पुर्वी नदी,ओढे,तलाव,झिरा व विहिरीतून पाणी घ्यायचे परंतु आता नदी,तलाव व विहिरी आटुलागल्या आहेत. विहीरीची खोली ५० ते ६० फुटांपर्यंत असायची परंतु पाण्याचा दुष्काळ पहाता ५० ते ६० फुटांपर्यंतचे विहिरीचेसुध्दा पाणी आटल्याचे दिसून येते. त्यामुळे आता मानवजातीने बोरवेलचा सहारा घेऊन ५०० ते ७०० फुटांवर पाण्यासाठी जावे लागत आहे.मनुष्याला पाण्याचा अधिकार फक्त ५० ते ६० फुटांपर्यंतच होता.परंतु मानवाने पाण्यासाठी संपूर्ण सीमा ओलांडून पाताळात जाऊन तेथील पाण्यावर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. म्हणजेच मानवाने सापाच्या बिळात हात टाकला आहे.ज्या पाण्यावर मानवजातीचा तिळमात्र अधिकार नाही तेही पाणी आपण आपली तहान भागवण्यासाठी वापरीत आहोत. हा मानवाचा निसर्गसृष्टीवर खुला अन्याय व अत्याचार नाही काय?आज मानवाच्या निष्काळजीपणामुळे व अतिरेकामुळे जंगले वाळुन (सुकली)गेली आहे.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसले आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.अनेक देशात गृहयुद्ध सुरू आहे.उदाहरण द्यायचे झाले तर रशिया -युक्रेन, इजरायल-गाजा-इराण- हिज्बुला युद्धाने जनुकाय रक्ताची नदी वाहत आहे की काय असे वाटत आहे.यामुळे युक्रेनमध्ये आगेचा लोंढा दीसत होता.त्याचप्रमाणे अनेक देश परमाणुपरीक्षण करतांना आपण पहातो.अशा परीस्थितीत भुमाता(पृथ्वी) पाण्याचे संग्रहन कसे काय करेल? मानव आज आगीशी खेळत आहे त्यामुळे तो पाण्याचे महत्व विसरल्याचे दिसून येते.कठीण परिस्थिती पाहता जगाने पाणी वाचवीण्याचा संकल्प करायला पाहिजे. अन्न,वस्त्र,निवारा आवश्यक आहे यात दुमत नाही.परंतु अन्न,वस्त्र, निवारा यांची उत्पत्ती ही पाण्यापासूनच होत असते.त्यामुळे भारतासह संपूर्ण जगाने विश्व जल दिवस साजरा करतांना पाण्याचे महत्व समजुन घेतले पाहिजे.जगापुढे शुद्ध पाण्याची गंभीर समस्या आहे. पाण्यासाठी अनेक देशांमध्ये हा!हा!कार! माजल्याचे दिसून येते.त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी भारतासह संपूर्ण जगाने युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.पर्यावयण व निसर्ग सुरक्षित तर पाणी सुरक्षित. पाणी सुरक्षित तर मानव, पशुपक्षी,जीव-जंतु सुरक्षित,जिव सृष्टी सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.आज अनेक देशांतील जंगल संपदा नस्तनाबुत करून कारखाने,शहरे मोठ्या प्रमाणात उभारले आहे.त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात जंगलातील हिंसक प्राणी (वाघ,अस्वल, सिंह, कोल्हा, बिबट्या, जहरीले साप) शहरात शिरकाव करतांना दिसतात.यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे जंगलातील पाण्याचा तुटवडा होय.आज पाण्यासाठी मानव व प्राणी एकमेकांचे कट्टर शत्रू बनल्याचे दिसून येते.त्यामुळे संपूर्ण जगाने पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. असे भाकीत आहे की २०४० मध्ये भारतात प्यायला पाणी मिळणार नाही.अशी स्थिती येवू शकते याला नाकारता येत नाही.संयुक्त राष्ट्राने जगातील पाण्याच्या परीस्थितीच्या अहवालामध्ये ही भीती वर्तवली आहे.जगात पुढे पाण्याचे भीषन संकट येणार असून भारत या संकटाच्या केंद्रस्थानी रहाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.नद्या, सरोवर, तलाव यामध्ये उपलब्ध असलेले पीण्याचे पाणी झपाट्याने प्रदुषित होत आहे.त्यामुळे कारखान्याचे दुषीतपाणी व सांडपाणी यांना पीण्याच्या पाण्यापासून कोसो दूर ठेवण्याची गरज आहे.दुषीत पाणी पील्यामुळे जगात दरवर्षी लाखोच्या संख्येने मानवीय हाणी व पशुपक्षांची हाणी मोठ्या प्रमाणात होतांना दिसुन येते यालाही थांबविण्याची गरज आहे. एकावर्षात पडलेले पावसाचे पाणी अडवीता आले तर पाच वर्षे पुरेल इतका पाणी साठा आपल्याला उपलब्ध होवू शकतो. परंतु त्यासाठी योग्य नियोजन करणे अजुनही आपल्याला जमले नाही.आताही ८० टक्के पाणी प्रदूषित आहे.पाण्याच्या स्त्रोतांचे होणारे प्रदुषण आणि पाणी साठविण्यासाठी नसलेले नियोजन हे दोन प्रश्न आहेत.यावर दुर्लक्ष सुरूच राहील्यास येणाऱ्या काही वर्षांत पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होवू शकते असा इशारा पर्यावरण तज्ज्ञांचे दिला आहे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे की पाणी संपले तर आपण संपु,आपण संपलो तर जग संपेल! त्यामुळे विश्व जल दिनाच्या निमित्ताने प्रत्येकांनी पाणी वाचविण्याचा संकल्पकेला पाहिजे.तेव्हाच पाणी वाचेल.त्याचप्रमाणे पाणी वाचवा देश वाचवा हा निर्धार संपूर्ण जगाने अंगीकारला पाहिजे. आज जगातील वाढती पाण्याची समस्या यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते. याकरीता जल विश्व दिनाच्या निमित्ताने वाढते प्रदुषण रोखण्याचा व पाणी वाचविण्याचा निर्धार सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.

**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**स्वतंत्र पत्रकार**
**मो.नं. ९९२१६९०७७९, नागपूर.**

# प्रांतपाल लॉ. गिरीश सीसोदिया यांची लॉयन्सच्या विविध सेवा प्रकल्पांना भेट

**जालना । प्रतिनिधी -** प्रांत ३२३४ एच-२ चे प्रांतपाल गिरीश सीसोदिया आणि प्रांताच्या पहिल्या महिला लॉयन संगीता सीसोदिया यांनी १९ मार्च रोजी जालना लॉयन्स क्लबला अधिकृत भेट देऊन, क्लब तर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध सेवा प्रकल्पांची पाहणी केली. त्यांच्या हस्ते चार पानपोयांचे उद्घाटन करण्यात आले.

क्लबचा कार्यकाळ १ जुलै ते ३० जून असा असतो. या कालावधीत क्लबचे सेवाकार्य व कामकाजाचा आढावा घेण्याची परंपरा आहे. त्यानुसार प्रांतपाल सिसोदिया यांचे शहरात आगमन होताच स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या उपस्थितीत जिल्हा सामान्य रुग्णालयात १२ दिवसांपासून सुरू असलेल्या पॅप स्मियर तपासणी मोहिमेचा समारोप करण्यात आला. राजीव गांधी मुकबधिर विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी कमलकिशोर झुनझुनवाला यांच्यावतीने महिन्याचे किराणा साहित्य प्रदान करण्यात आले. सात दिवसीय ऍक्युप्रेशर व क्युपंक्चर शिबिराचा समारोप त्यांच्या हस्ते करण्यात आला. याशिवाय शरद गांधी, जगदीश भुतडा, बालाप्रसाद भक्कड, प्रतीक लड्ढा यांच्या सौजन्याने चार पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. डेंटल क्लिनिक व दृष्टी रक्षक व्हॅन या स्थायी प्रकल्पांना त्यांनी भेटी दिल्या. गिरीश सिसोदिया यांचा अर्चना नितीन तोतला, शकुंतला प्रकाशचंद्र लड्ढा, राजेश अग्रवाल,नीता राजेश भुतिया, सरीता कमलकिशोर बगडीया, वंदना द्वारकादास मुदंडा यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.





तदनंतर कमलकिशोर बगडिया यांच्या निवासस्थानी बैठक पार पडली. सायंकाळी ७:३० वाजता द्वारकादास मुदंडा यांच्या घरापासून रुक्मिणी गार्डनपर्यंत प्रांतपाल यांची सपत्नीक कृष्ण - रुक्मणीच्या वेशात बग्गीमध्ये सवाद्य भव्य शोभायात्रा काढण्यात आली. रंगपंचमीच्या निमित्ताने लायन्स महिला सदस्यांनी फुलांची होळी खेळून आनंदोत्सव साजरा केला. रात्री आठ वाजता झालेल्या सर्वसाधारण बैठकीत क्लबच्या आतापर्यंतच्या सेवा कार्याचा आढावा घेण्यात आला. याप्रसंगी माजी प्रांतपाल, विविध समन्वयक आणि पदाधिकाऱ्यांना गिरीश सिसोदिया यांच्या हस्ते प्रमाणपत्र व लॉयन्स पिन प्रदान करण्यात आली. अध्यक्ष जयश्री लड्ढा व सचिव मंजू श्रीमाली यांनी क्लबच्या कार्याचा आढावा सादर केला. कोषाध्यक्ष कल्पना बियाणी यांनी सेवाकार्यासाठी मिळालेल्या देणग्या व खर्चाचा हिशोब सादर केला. माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरीया यांनी क्लबच्या ५८ वर्षांच्या ऐतिहासिक वाटचालीची माहिती दिली व पुढच्या नवीन कार्यकारिणीच्या नियोजनाची माहिती दिली. सीए नितीन तोतला यांनी प्रांतपालांचा परिचय करून दिला.

गिरीश सीसोदिया यांनी क्लबच्या १६० सदस्यसंख्येचा गौरव करत जालना क्लबच्या ५८ वर्षांच्या सेवाकार्याचे कौतुक केले. महिला टीमच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा उत्कृष्ट नियोजनाबद्दल त्यांनी विशेष प्रशंसा केली. परतूरच्या दृष्टि लायन्स नेत्रालयात लवकरच दोन डायलिसिस मशीन उपलब्ध होणार असून, त्यातील एक मशीन सीए नितीन तोतला यांच्याकडून दान करण्यात येणार आहे. राजेश लुणीया यांच्या प्रयत्नातुन रवींद्र हुशे व विठ्ठल पवार यांनी प्रत्येकी १००० डॉलरची देणगी एलसीआयएफसाठी प्रांतपालांकडे सुपूर्द केली. यावेळी लायन्स सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भीम फेस्टिवल समितीच्या अध्यक्षपदी नंदकिशोर जांगडे

# जालन्यात ५- ६ एप्रिल दरम्यान आयोजन



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात दिनांक ५-६ एप्रिल दरम्यान भीम फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले असून या भीम फेस्टिवल समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर जांगडे यांची निवड करण्यात आली आहे.

जालना शहरात गेल्या १० वर्षापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भीम फेस्टिवलचे आयोजन करण्यात येत आहे. या भीम फेस्टिवलमध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक- गायिका, लोककलावंतांनी हजेरी लावली आहे. भीम फेस्टिवल समितीची नूतन कार्यकारिणी निवडण्यासाठी शुक्रवारी ( दि. २१) भीम फेस्टिवलचे संस्थापक सचिव सुनील साळवे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीत भीम फेस्टिवल समितीच्या अध्यक्षपदी नंदकिशोर जांगडे यांची निवड करण्यात आली. प्रारंभी भीम फेस्टिवलचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत अरूण मगरे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली यावेळी धनसिंह सुर्यवंशी यांनी भिम फेस्टिवलची भुमिका विषद केली.दिनांक ५- ६ एप्रिल दरम्यान आयोजित या भीम फेस्टिवलमध्ये ख्यातनाम गायक साजन बेंद्रे हे भीमगीतांचा कार्यक्रम सादर करणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

या बैठकीस छत्रपती फाउंडेशनचे सुनील रत्नपारखे, लहुजी शक्ति सेनेचे सचिन क्षीरसागर, फिलिप उगले, सुहास साळवे, राजू मोरे, सुमित वाघमारे, राजेंद्र जाधव, सरपंच विठ्ठल गवारे, रवी ढगे, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे फेस्टिवलचे अंकुश राजगिरे,रवी इंगळे, राम शिंदे, निरंत पट्टेबहाद्दूर, प्रशांत खरात, रोहन डोळसे,सनी साळवे, प्रणय गंगातिरवे, रोहन जगताप, जय खरात, गणेश इंगळे, अशोक खाडे, बाळू म्हसके, इम्रान पठाण, नईम शेख, तन्मय मोरे, आनंद म्हस्के, शेख अनस, अमित साळवे आदींची उपस्थिती होती. शेवटी आभार रंजित मगरे यांनी मानले.

## अलीना शेख वजीर या ८ वर्षाच्या चिमुकलीने ठेवला आयुष्यातील पहिला रोजा

**परतुर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील प्रसिद्ध गुत्तेदार शेख वजीर यांची मुलगी ८ वर्षीय शेख अलीना या चिमुकली मुलीने माहे रमजान या पवित्र महिन्यातील पहिला रोजा पूर्ण केला आहे. कडक उन्हाळयात जिवाची लाही लाही होत असताना,अशा अवघड परिस्थितीतही माहे रमजानमध्ये पहाटे पाच ते सायंकाळी सात वाजेपर्यंत अन्न,पाणी न घेता जवळपास अखंड चौदा तासांचा रोजा उपवास पूर्ण केला आहे.



इस्लाम धर्मात पाच तत्वांपैकी रोजा याला विशेष महत्त्व आहे, दिवसभरात थुंकीही न गिळता पवित्र असा रोजा मुस्लिम बांधव पुर्ण करतात,असा कडक रोजा उपवास शेख अलीना यांने पुर्ण केला असून पहिला रोजा सोडताना इफ्तारच्या वेळी उपवास सोडताना हार घालण्यात आला होता,एवढया लहान वयातच तिने रमजानचा पहिला उपवास केल्याने आजोबा शेख मुसा. चुलते शेख नजीर शेख नासिर शेख राजू व मामा सैय्यद तय्यब. सैय्यद ताहेर सैय्यद मोसिन.नाना सैय्यद महाम्दली यांच्या सर्व नातेवाईकांकडून सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# कठोराबाजार येथे मतिमंद महिलेवर अत्याचार

## मानवतेला काळीमा फासणारी घटना

**भोकरदन । प्रतिनिधी -** शेतात काड्या गौऱ्या आणण्यासाठी गेलेल्या मतिमंद महिलेवर तिघांनी आळीपाळीने बलात्कार केल्याची घटना घडली आहे. कोणाला सांगितल्यास तिला जीवे मारण्याची धमकी आरोपींनी दिली. आठ दिवसानंतर या पुतण्याने काकाला सांगितल्यानंतर घटना गुरुवारी (दि.२०) ही उघडकीस आली आहे.

या प्रकारणी मतिमंद महिलेच्या पतीने दिलेल्या फिर्यादीवरुन सद्दामखॉ अजमेरखॉ पठाण, सादीकखॉ शरीफखॉ पठाण, फारुखखॉ जिलाणीखॉ पठाण (सर्व रा.कठोराबाजार ता.भोकरदन) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिलेल्या फिर्यादीत पिडीत महिलेच्या पतिने म्हटले आहे की, एक वर्षापूर्वी आमचे लग्न झाले असून माझी पत्नी मतीमंद आहे. आमची गावा शेजारी शेत जमीन असून आमची उपजीविका पूर्ण शेतीवरच आहे. दरम्यान अधिक माहिती आशि की,गुरुवारी (दि.१३) दुपारी १ वाजेदरम्यान आम्ही दोघांनी जेवन केले. त्यानंतर पत्नीही शेतात जळतन आणण्यासाठी गेली आणि मात्र सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास परत आली. तिचा पती घरात आल्यानंतर ती रडत होती, पण ती मतीमंद असल्याने ती काही एक सागत नव्हती. तिला वारंवार काय झाले असे विचारण्यात येत होते मात्र तिला काही सांगता येत नसल्याचे देखिल फिर्यादीत म्हटले आहे.



दरम्यान पिडीत महिलेच्या पतीने दिलेल्या फिर्यादीत असेही म्हटले आहे की गुरुवारी (दि.२०) रात्री १० वाजेदरम्यान माझा पुतण्या घरी आला व त्यांने सांगितले की, गुरुवारी (दि.१३) दुपारी २ ते ३ वाजेदरम्यान मी शेतात काम करत असतांना मला तुमच्या शेतात ओरडण्याचा आवाज आल्याने मी शेतात जावुन पाहीले असता तुमच्या शेताजवळ असलेल्या नाल्याजवळ काकुला आपल्या गावातील सद्दामखॉ अजमेरखॉ पठाण, सादीकखॉ शरीफखॉ पठाण, फारुखखॉ जिलाणीखॉ पठाण यांनी त्यांचे कपडे काढुन तिघे जण त्यांचा बलत्कार करतांना मी लांबून पाहीले. तेव्हा माझ्या मोबाईलच्या कॅमेरामध्ये व्हीडीओ चालु करुन जवळ गेलो असता दोघे मला पाहुन पळून गेले. यातील फारुख फारुखा त्यांचा छळ करत होता. आरडाओरडा केल्यानंतर काकूची सुटका झाली. यानंतर काकूला घरी घेऊन येत असतांना सद्दामखॉ अजमेरखॉ पठाण याने अडवून माझा मोबाईल फोडला व त्याने धमकी दिली की, तु जर आम्ही काय केले आहे हे कोणाला सांगीतले तर तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवुन तेथुन निघुन गेला. परंतु त्यापूर्वी माझ्या मोबाईलमध्ये काढलेला व्हिडीओ माझ्या एका मित्राच्या व्हॉटसअप वर पाठवला होता. त्यानंतर काकूंना गावाजवळ सोडुन निघुन गेलो असे त्यांने सांगीतले. याबाबत झालेल्या घटनेची माहिती गुरुवारी काकाला दिल्यानंतर काकांनी म्हणजे पिडीत मतीमंद महिलेच्या पतीने भोकरदन पोलीस ठाण्यात तक्रार दिली. यावरून या तिघांना अटक करण्यात आली असून तिघांनाही तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## मियासाहब यांच्या उरूस निमित्त सालाबादाप्रमाणे यावर्षीही रोजा इफ्तार कार्यक्रम



**जालना । प्रतिनिधी -** दर्गा ह. जानूल्लाह शाह (बाबा) मियासाहब यांच्या ३५३ उरुसानिमित्त पवित्र रमजान महिन्याच्या २१ व्या रोजा निमित्त प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मता दृढ व्हावी म्हणून दि. २२ मार्च २०२५ शनिवार रोजी रोजा इफ्तारचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दर्गा ह. जानूल्लाह शाह (बाबा) खुद्दाम व्यवस्थापक समितीच्या वतीने दर्गाशरीफ (मस्तगड) जुना जालना येथे शनिवार दि. २२ मार्च रोजी ठीक सायंकाळी ५:३० वाजता आयोजित कार्यक्रमात शहरातील सर्व पक्षाचे मान्यवर नेते सामाजिक कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

याप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन खुद्दाम कमिटीचे पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे. शनिवार दि. २२ मार्च रोजी दर्गा ह. जानुल्लाह शाह (मियासाहेब) यांचा सालाबादाप्रमाणे उरूस साजरा करण्यात येतो यामध्ये शहर व जिल्ह्यातील सर्व धर्माचे नागरिक मोठ्या संख्येने हजेरी लावतात हे धार्मिक स्थळ राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे.

## वाचकांचे मनोगत

# पाणी टंचाई समस्येतून बाहेर कधी पडणार ?

पाणी हेच जीवन आहे.त्याशिवाय तरणोपाय नाही.उपलब्ध असलेले पाण्याचे साठे डिसेंबर अखेरीस आटण्यास सुरुवात होते.नद्या, विहीरी,तलाव पावसाळ्यात भरून वाहत असतात. मात्र, हिवाळा संपताच पाण्याचे नैसर्गिक स्रोत कमी कमी होत जातात. महाराष्ट्र सरकार, केंद्र सरकार यांनी पाण्याचे नवीन स्रोत निर्माण करावयास हवेत. ब्रिटिशांनी मुंबईत १५० मैल दुरून मुंबईत पाणी आणले.मुंबई महानगरपालिकेला पाणी पुरवठा करणारे सहा तलाव ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात आहेत. मुंबईतील नागरिकांना ४५०० दशलक्ष लिटर दररोज पाणी लागते.स्वातंत्र्यानंतर मध्य वैतरणा तलावाची भर पडली.मुंबई महानगरपालिकेची लोकसंख्या एक कोटी तीस लाखाहून अधिक आहे.सर्व नागरिकांना पाणी पुरवण्यात प्रशासन कटिबद्ध आहे.अशीच पाणी वितरणाची व्यवस्था अन्य महानगरपालिकांनी विचारात घेऊन काम केले पाहिजे.स्वतःचे पाण्याचे स्रोत निर्माण केले पाहिजेत. महाराष्ट्रातील कोकण विभागात सर्वाधिक पर्जन्यवृष्टी होते. पावसाळ्यात ओढे,नद्या, तलाव भरून पाणी वाहून जाते ते समुद्राला जाऊन मिळते.वाया जाणारे पाणी वाचवण्याचा प्रयत्न सरकार करताना दिसत नाही.सरकारनेच पुढील पन्नास वर्षाच्या साठ्याचा विचार केला तरच पुढील येणारी पिढी वाचेल.कोकणातील ग्रामपंचायती कडून नागरिकांना दररोज अर्धा तास पाणी पुरवठा केला जातो.घरातील कामा करिता लागणारे पाणी,गुरे वासरे यांना पाणी,झाडामाडांना लागणारे पाणी अपूरे पडते.घरात आठ दहा माणसांचे कुटुंब असलेल्यांना अर्धा तासात येणारे पाणी पुरत नाही.नळाला येणारे पाणी लांबून येत असल्याने पाण्याचा दाब कमी असतो. गावातील पाणी समस्या गंभीर आहे.किमान अर्धा दिवस पाणी पुरवठा करता येईल एवढी क्षमता हवी.स्वातंत्र्यानंतर अनेक आमदार, खासदार लोकप्रतिनिधींना मतदारांनी निवडणुकीत निवडून दिले त्यांनी पाणी विषय गांभीर्याने घेतला नाही त्याचाच परिणाम भविष्यात निर्माण होणार आहे.आता तरी विद्यमान आमदार, खासदार यांनी पाणी विषयावर अभ्यास करून सरकार पुढे मांडला तर आणि तरच पाणी समस्येतून भविष्यात सुटका होईल. असे मला वाटते.

**महादेव गोळवसकर,**
**कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

## पान १ वरुन

### परतूर नगरपालिकेमध्ये ...

चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची भरती करण्यात यावी. उपजिल्हा रुग्णालय ग्रामीण रुग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र या ठिकाणी स्थायी स्वरूपात मेडिकल ऑफिसर ची नियुक्ती करण्यात यावी. प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व इतर सर्व आरोग्य सुविधा देणाऱ्या संस्थांमध्ये कायमस्वरूपी पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात यावी विजेचा प्रश्न वारंवार निर्माण होतो त्यासाठी सौर ऊर्जा संच बसविण्यात यावेत. अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत केली.

जिल्हा शासकीय रुग्णालय वगळता उप जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी वारंवार अत्यावश्यक औषधींचा मोठा तुटवडा भासत हा तुटवडा कृत्रिम असून तालुका पातळीवरील उपजिल्हा रुग्णालय ग्रामीण रुग्णालय किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रावरून औषधी उपलब्ध होत नाहीत परंतु रुग्णांना औषधांची प्रीस्क्रिपशन देऊन खाजगी मेडिकल स्टोर वरून खरेदी करण्यास सांगितले जात आहे. औषधांचा आरोग्य संस्थांना झालेला पुरवठा व संबंधित आरोग्य संस्थांनी रुग्णांना केलेले वाटप या सर्व बाबींमध्ये अनियमितता आढळून येत आहे असे चित्र आहे. जिल्हा पातळीपासून प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत औषधांचा पुरवठा व रुग्णांना केलेले वाटप या संदर्भात रुग्ण कल्याण समिती मार्फत ऑडिट करून त्याचा अहवाल शासनाकडे सादर करणे आवश्यक असून या संदर्भाने शासनाने तात्काळ परिपत्रक काढून संबंधितांना सूचित करावे अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधिमंडळात केली.

आदिवासी विभागामध्ये अनागोंदी कारभार सुरू असून सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड मोठा त्रास सहन करावा लागतो आहे धुळे नंदुरबार चंद्रपूर गडचिरोली यासारखे आदिवासी बांधव बहुल जिल्हे वगळता इतर जिल्ह्यांमध्ये आदिवासी विकासाच्या योजनांकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे चित्र आहे. दिनांक १३/०८/२०२४ रोजी ऑनलाइन पद्धतीने संपन्न झालेल्या शबरी आदिवासी घरकुल योजना जिल्हास्तरीय निवड समिती बैठकीच्या अनुषंगाने मंजुर लाभार्थी यादी, प्रशासकिय मान्यता आदेश व बैठकीच्या इतिवृतावर केवळ अध्यक्षीय स्वाक्षरी न झाल्यामुळे १६३२ लाभार्थ्यांचे घरकुल मंजुरी प्रलंबित आहे. समितीमधील इतर सर्व सदस्यांनी अध्यक्षीय स्वाक्षरी होईल असा विश्वास दर्शवुन तात्काळ स्वाक्षरी केलेल्या आहेत. परंतु सही कुणी करावी या आजी व माजी अध्यक्षांच्या कलगीतुऱ्यात सर्वसामान्य आदिवासी बांधवांचे मोठे नुकसान होत आहे असेही आमदार बबनराव लोणीकर विधानसभेत म्हणाले.

अद्याप पर्यंत ग्रामीण किंवा शहर विभागासाठी शबरी आवास योजनेअंतर्गत घरकुल योजनेसाठी लक्षांक दिलेला नाही, तो तात्काळ देण्यात यावा. शहरी किंवा ग्रामीण भागामध्ये ज्या भागात आदिवासी समाज बांधव राहतात ती जागा अद्यापही संबंधितांच्या नावे नाही त्यामुळे त्यांना घरकुलासह शासनाच्या कुठल्याही योजनांचा लाभ घेता येत नाही. आदिवासी समाज बांधवांच्या जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी १९५० पूर्वीचा पुरावा देण्यात यावा अशी अट घालण्यात आली आहे. परंतु आदिवासी समाज बांधवांकडे यासंबंधीचा लेखी स्वरूपात कुठलाही पुरावा उपलब्ध नसल्यामुळे शरीरासाठी ती अट शिथिल करण्यात यावी. अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत केली.

आदिवासी भूमिहीन शेतकरी बांधवांसाठी स्वाभिमानी सबलीकरण योजनेअंतर्गत शेती खरेदीसाठी असणारा २०२२ चा शासन निर्णय नुसार कोरडवाहू जमिन खरेदीसाठी ०५ लाख रुपये तर बागायती जमिनीसाठी ०८ लाख रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. परंतु आज मात्र त्या भावाने जमीन मिळत नाही. त्यामुळे हा दर वाढवून कोरडवाहू जमिनीसाठी ०८ ते १० लाख रुपये आणि बागायती जमिनीसाठी १२ ते १५ लाख रुपये करण्यात यावा. स्वाभिमानी सबलीकरण योजनेअंतर्गत शासनाने खरेदी केलेली जमीन अद्याप पर्यंत आदिवासी बांधवांना वाटप करण्यात आलेली नाही परिणामी या योजनेवर नियंत्रण करणारे जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी व तत्सम यंत्रणा यांच्या ऐवजी आदिवासी विकास विभागाकडे ही योजना पूर्णतः सुपूर्द करण्यात यावी. आदिवासी वाडी, वस्ती, पालांवर भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुबलक प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात यावा. अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत केली.

### शिवद्रोही प्रशांत ...

आणि शौर्या ऐवजी असाच मजकूर इंटरनेट महाजाळातून जगभर जात आहे आणि या युगप्रवर्तक महापुरुषांची बदनामी होत आहे. तरी तातडीने हा असा मजकूराचा भाग वगळण्यात यावा आणि पुढील आवृत्तीत समाविष्ट करू नये यासाठी शासनाने तात्काळ कायदेशीर प्रतिबंध करावा. या सर्व मागण्यांवर तात्काळ कारवाई करावी नसता जालना जिल्हयासह राज्याभरात तिव्र आंदोलन करण्याचा करण्यात येईल. याची गंभीर नोंद घ्यावी असे देखील या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी डॉ. संजय लाखे पाटील, ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, अक्षय गोरंट्याल, रमेश गव्हाड, दत्ता घुले, जगन्नाथ काकडे, संतोष गाजरे, राजेंद्र गोरे, अशोक पडूळ, सुभाष कोळकर, संदिप ताडगे, मछींद्र घोगरे, अनिल मदन, सुभाष चव्हाण, धर्मा खिल्लारे, अशोक उबाळे, सतीश देशमुख, माऊली कदम, भरत मानकर, उदय देशमुख, गणेश शिंदे, शुभम टेकाळे, करण जाधव, ऍडव्होकेट शैलेश देशमुख, सचिन कचरे, योगेश पाटील, रवी वाडेकर, अर्जुन गजर, सागर पाटील, गजानन काळे, रमेश गजर, नरसिंह पवार, सदाशिव भुतेकर, नारायण वाडेकर, राम देठे, गणेश कावळे, संतोष चाळसे, साईनाथ पवार, राम चव्हाण, राहुल गाडेकर, अनिरुद्ध शेळके आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### जालन्यात विधीनाट्य ...

करीत आहे. या शिबिरासाठी मर्यादित जागा असून वय वर्षे १४ ते ४० या वयोगटातील नवोदित कलाकारांनी त्वरित नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी ९४२१५९४९११ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन शिबिर संचालक लोककला अभ्यासक लोकशाहीर आप्पासाहेब उगले यांनी केले आहे.

### संभाजी ब्रिगेड ....

मुख्य कार्यकारी अधिकारी जालना यांना सर्व ग्रामसेवक यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी या आशयाचे निवेदन देण्यात आले.याचाच परिणाम म्हणजे पंचायत समिती मंठा याना मुख्यालयी राहत नसलेल्या सर्व दोषी ग्रामसेवक यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्या संदर्भाचे आदेश उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून देण्यात आले आहेत. विधान परिषदेमध्ये हा आवाज गर्जला असता मंठा गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवक यांची भागमभाग पहावयास मिळाली.

# लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचे प्रश्न निकाली काढा अन्यथा आंदोलन

## लिपिकवर्गीय कर्मचारी संघटनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

**जालना | प्रतिनिधी -** जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत लिपिक वर्गीय कर्मचार्यांचा १०, २०, व ३० वर्ष सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजुर करणे व पदोन्नतीचे प्रकरणे निकाली काढण्यात यावा अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, अशा इशार्याचे निवेदन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तथा अध्यक्ष विभागीय पदोन्नती समिती जिल्हा परिषद जालना यांना महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचारी संघटनेच्या वतीने देण्यात आले आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत लिपिक वर्गीय कर्मचार्यांचे गेल्या २०२३ पासुन सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित १०, २०, व ३० वर्ष सेवा पुर्ण झालेल्या कर्मचार्यांचे आश्वासित प्रगती योजनेचा लाभ 'अद्याप देण्यात आलेला नसुन संघटना याबाबत आपणास गेल्या एक वर्षापासुन सतत पाठपुरावा करत आहे. आपण प्रत्येक वेळी आठ दिवसाचे मुदत देवुन प्रकरणे निकाली काढण्याचे आश्वासन देत आहात. परंतु आपल्या आश्वासना उपरही प्रकरण निकाली निघाले नाही. आपण लिपिक संवर्गाचे संवर्ग प्रमुख आहात व इतर सर्व संवर्गाच्या पदोन्नती समितीचे आध्यक्ष आहात. इतर सर्व संवर्गाचे १०, २०, ३० व पदोन्नतीचे प्रकरणे निकाली काढले आहे. मात्र आपल्याच लिपिक संवर्गाचे प्रकरण जानुन बुजून हेतूपुरस्कर प्रलंबित ठेवत असल्याची संघटनेची धारणा झाली आहे.मुख्यमंत्र्यांचा १०० दिवसांचा ७ कलमी कार्यक्रमामध्ये कर्मचार्यांचे समस्या, सेवा विषयक बाबी निकाली काढण्या बाबत समावेश आहे.

या १०० दिवसांच्या कृती आराखडामध्ये आमचे प्रश्न तात्काळ निकाली काढण्यात यावे अन्यथा संघटनेस नाईलाजास्तव आंदोलनाचा पावित्रा घ्यावा लागेल, असा इशाराही निवेदनाव्दारे राज्य जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचारी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल भेरे-पाटील, राज्य उपाध्यक्ष संजय चव्हाण, मराठवाडा विभागीय अध्यक्ष संजय जगताप, जिल्हा सचिव सनी कटकम, दत्तात्रय जैवाळ, राखे आदींची उपस्थिती होती.



# काम न करता मनपात दोनशेवर कर्मचारी घेताहेत पगार

## साद बीन मुबारक यांच्या आरोपाने खळबळ

**जालना | प्रतिनिधी -** जालना शहर महानगर पालिकेत ३०० पेक्षा अधिक स्वच्छता कर्मचारी आहेत. यापैकी २५० पेक्षा अधिक स्वच्छता कर्मचारी कोणतेही काम न करता घरात बसून फुकटचा पगार घेत असल्याचा गंभीर आरोप समाजसेवक साद बीन मुबारक यांनी केला आहे. या आरोपाने शहरभरात खळबळ उडाली असून मनपात काम न करता पगार घेणारे ते कर्मचारी नेमके कोण? आणि त्यांच्यावर कारवाई होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



साद बीन मुबारक यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडून जालना शहर महानगरपालिकेमधील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या एकुण संख्येबाबत माहिती मागवली होती. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर साद बीन मुबारक यांनी माध्यमांसमोर स्वच्छता कर्मचाऱ्यांचा भांडेफोड केला. जालना महानगरपालिकेत एकेका अधिकाऱ्यांकडे ३-३ विभागाचा प्रभार देण्यात आलेला आहे. यातून अधिकारी मोठा भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला.लिपिक, लेखापाल यांना केवळ एकाच विभागाचा चार्ज देण्यात यावा, अशी मागणी देखील मुबारक यांनी केली आहे. महापालिका आयुक्तांनी अधिकाऱ्यांची मूळ विभागात बदली करावी यांच्याकडे असलेला अतिरीक्त चार्ज काढून घेण्याची मागणीही त्यांनी केली. ३०० पेक्षा अधिक असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांपैकी ४१ कर्मचारीच महापालिकेत काम करत असून ईतर कर्मचारी घरी बसून पगार खात असल्याचा आरोप मुबारक यांनी केला. या आयतेखाऊ कर्मचाऱ्यांमुळेच शहरात स्वच्छतेचे तीन तेरा वाजल्याचा आरोप मुबारक यांनी केला.

तसेच २५० स्वच्छता कर्मचारी बसून पगार घेत असून त्यांच्या पगारांमधून स्वच्छता निरीक्षक यांच्यापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत या पगारांमध्ये मोठा भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप साद बीन मुबारक यांनी केला आहे.

याविषयी आपण लवकरच जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्या निदर्शनास हा भ्रष्टाचार आणून देणार असल्याचेही ते म्हणाले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.